


'लोकमत'ने आयोजित केलेल्या 'अवघा विठ्ठल' कार्यक्रमाचे उद्घाटन सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर ए. यू. कॉर्पोरेट ॲडव्हायझरी ॲंड लीगल सर्व्हिसेसचे अक्षय खेतान, व्हॅल्युएबल ग्रुपचे चेअरमन नरेंद्र थेटे, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रशासक विद्याधर अनासकर उपस्थित होते.




'अवघा विठ्ठल' या कार्यक्रमात गायिका श्रुती बुजरबरूआ, गायक राजयोग धुरी यांनी आपल्या सुरांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे निरुपण धनश्री प्रधान-दामले यांनी केले.

छाया: दत्ता खेडेकर

# विठ्ठलाच्या नामघोषात रंगली आषाढीची भजनसंध्या

## तरुण गायक राजयोग धुरी, श्रुती बुजरबरूआ यांच्या सुमधूर आवाजाने दादरच्या वीर सावरकर सभागृहात रसिक मंत्रमुग्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** संत ज्ञानेश्वरांना विठ्ठल हा जसा चराचरात दिसला तसा त्यांनी तो मांडला. संत तुकारामांना विठुराया निसर्गासह मानवी रूपातही दिसला तसा त्यांनी तो त्यांच्या अभंगातून मांडला. संतांनी त्यांना दिसलेला, भावलेला, अनुभूती आलेला विठ्ठल शब्दांतून मांडला. त्या शब्दांना स्वराची साथ लाभल्यानंतर तोच विठ्ठल आषाढी एकादशीच्या निमित्ताने 'लोकमत' आयोजित 'अवघा विठ्ठल' या संगीतमय कार्यक्रमातून रसिक श्रोत्यांनाही अनुभवायला मिळाला.

आषाढीच्या निमित्ताने 'लोकमत'तर्फे मुंबईच्या दादर येथील सावरकर स्मारक येथे या विशेष भक्तिसंगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. रसिकांची भाऊगर्दी असलेल्या या मैफलीची सुरुवात श्रुती बुजरबरूआ-गोडबोले यांनी 'जय जय रामकृष्ण हरी' हा गजर त्यांनी अनोख्या अंदाजात पेश करत वातावरणात भक्तिरसाची पेरणी केली. त्यानंतर 'पांडुरंग कांती दिव्य तेज झळकती' हा अभंग सादर केला.

अठराव्या वर्षात प्रवेश केलेले तरुण प्रतिभावान गायक राजयोग धुरी यांनी 'मदनाचा पुतळा राजस सुकुमार' या तुकारामांच्या अभंगाने आपल्या गायनाची सुरुवात केली. सुरुवातीला तीन मिनिटे जो आलाप त्यांनी घेतला त्या आलापानेच श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकले. राजयोग यांनी त्यानंतर 'इंद्रायणी

लोकमत
अवघा विठ्ठल
A LOKMAT SUR JYOTSNA INITIATIVE
SUGEE
प्रस्तुत
MSC
बँकिंग पार्टनर
पार्टनर

काठी, नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग' असे एकापेक्षा एक श्रेष्ठ अभंग सादर केले. या तरुण गायकाची प्रतिभा पाहून आपण थक्क झालो, अशी भावना अनेक प्रेक्षक व्यक्त करत होते. तबला, मृदंग ही वाद्ये गाण्याची रंगत अधिक वाढवत होती. त्यांच्या ठेक्यावर रसिकही आपल्या टाळ्यांनी ठेका धरत होते.

कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रशासक विद्याधर अनास्कर, ए. यू. कॉर्पोरेट ॲडव्हायझरी ॲंड लीगल सर्व्हिसेसचे अक्षय खेतान, व्हॅल्युएबल ग्रुपचे चेअरमन नरेंद्र थेटे, न्यू एज मीडिया पार्टनर प्रा. लि.चे संचालक प्रसाद कुलकर्णी, स्वरगंधार संस्थेच्या मंदार कर्णिक यांची उपस्थिती होती. प्रारंभी मुंबई 'लोकमत'चे संपादक अतुल कुलकर्णी यांनी उपस्थित मान्यवरांचे ज्ञानेश्वरीची प्रत भेट देऊन स्वागत केले. या कार्यक्रमाचे संगीत संजोजन सत्यजित प्रभू यांनी केले होते. निरुपण धनश्री प्रधान-दामले यांनी केले. एकीकडे दोन्ही गायक स्वरसाज चढवत होते त्याचवेळी चित्रकार उमेश पांचाळ हे व्यासपीठाच्या एका बाजूला विठ्ठलाचे चित्र साकारत होते. स्वर आणि चित्र असा अनोखा संयोग यावेळी अनुभवता आला.

“

### ज्ञानेश्वरांचे कार्य जगभर जाण्यासाठी काम करावे

संत ज्ञानेश्वरांनी माणसाचा माणसाशी, निसर्गाशी, प्राणिमात्राशी व विश्वाशी असलेला संबंध अत्यंत लहान वयात उलगडून सांगितला. परमार्थाचा मार्ग काय याची त्यांनी दिलेली व्याख्या आजही जगाला दिशा देणारी आहे. भौतिक जग व व्यवहार शिकविणारी परा व आत्मभान आणि आत्मज्ञानाचा मार्ग दाखविणारी अपरा अशा दोन विद्या जगात आहेत. या विद्यांचा संगम ज्या ठिकाणी होतो त्या तल्लीन अवस्थेचे नाव म्हणजे विठ्ठल आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी (७५० व्या) जयंती वर्षानिमित्त त्यांचे कार्य व विचार जगापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपली आहे.

**आशिष शेलार,** सांस्कृतिक कार्यमंत्री